NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# भारतीय लोकशाही समोरील आव्हाने

वर्षा प्रकाश आसबे, संशोधक विद्यार्थीनी, राज्यशास्त्र विभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

## अ. प्रास्ताविक –

जागतिक पातळीवर सद्यकाळात लोकशाही हा शासनाचा प्रकार उत्तम व लोकप्रिय ठरला आहे. व्यक्ती स्वातंत्र्य, संविधान, कायदेशीर हक्क, स्वतंत्र न्यायव्यवस्था व निवडणुक यंत्रणा या महत्त्वपूर्ण बाबींमुळे जागतिक स्तरावर लोकशाही लोकप्रिय बनली आहे. भारतही त्याला अपवाद नाही. २६ जानेवारी १९५० रोजी भारतात राज्यघटनेच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. भाषण व विचार स्वातंत्र्य हा भारतीय लोकशाहीचा पाया आहे. भारतीय लिखित संविधानानुसार नागरिकांना मूलभूत हक्क, स्वतंत्र न्यायव्यवस्था व निवडणूक यंत्रणा, प्रौढ मताधिकार, समता व बंधुता अशा विविध बाबींची तरतूद संविधानात करण्यात आली. त्यातून सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट गाठण्याचे प्रयत्न सुरू झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे राजकीय लोकशाही होय. परंतु भारतात जेव्हा आर्थिक व सामाजिक समता निर्माण होईल तेव्हा खरी लोकशाही अस्तित्वात येईल. महात्मा गांधीजींच्या मते, लोकशाही ही एक जीवन जगण्याची पद्धती आहे. विनोबा भावे यांनी लोकशाही लोकनीती या तत्वाद्वारे सांगितली. थोडक्यात अशा विविध अर्थाने लोकशाहीचे महत्त्व दिसून येते. आज भारतीय लोकशाहीला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. व्यक्तीच्या व राज्याच्या विकासात या लोकशाही व्यवस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. असे असले तरी गेल्या ७५ वर्षात भारतीय लोकशाही समोर असंख्य आव्हाने उभी राहिली आहेत. या विविध आव्हानांची चर्चा व त्यावर उपाययोजना करण्याच्या हेतूने प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**की वर्ड** – लोकशाही, संविधान, व्यक्ती स्वातंत्र्य, सर्वसमावेशकता, राजकीय सहभाग, निवडणुका.

## ब. उद्दिष्ट्ये –

प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन करताना भारतीय लोकशाही समोर उभारलेल्या आव्हानांचा अभ्यास करणे व त्या विविध आव्हानांच्या निर्मितीच्या कारणांचा शोध घेणे. तसेच त्या आव्हानांना दूर करण्यासाठी विविध उपाययोजना सुचविण्याचा उद्देश ठेवला आहे.

## क. भारतीय लोकशाही –

प्रौढ मताधिकाराद्वारे खुल्या व निपक्ष वातावरणामध्ये निवडणुकीच्या माध्यमातून निवडले गेलेल्या प्रतिनिध मार्फत चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय. मुलत: अध्यक्षीय व संसदीय लोकशाही असे लोकशाहीचे दोन प्रकार आढळतात. यापैकी भारताने राज्यकारभारासाठी संसदीय लोकशाही हा शासन प्रकार निवडला आहे. त्यामुळे भारतात मंत्रिमंडळ आणि संसद हे एकमेकांवर अवलंबून आहेत. तर मंत्रिमंडळ हे संसदेला जबाबदार राहून कार्य करते. जनतेतून प्रतिनिधींची निवड झाल्यामुळे ते जनहिताचे कायदे व कामे करतात. त्यातून व्यक्ती व राज्य या दोहोंचा विकास होण्यास हातभार लागतो आहे. असे असले तरी गेल्या चार दशकात भारतीय लोकशाहीसमोर विविध आव्हाने उभी राहिली आहेत. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

**ड. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने –**

**१. लोकशाही तत्वांना धोका –**

भारतीय लोकशाहीत गेल्या चार दशकापासून लोकशाहीतील व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता, व न्याय या तत्वांना धोका निर्माण झाला आहे. नागरिकांचे आचार, विचार, भाषण व मुद्रण स्वातंत्र्य यांचा समावेश या स्वातंत्र्यात होतो. भारतीय लोकशाहीत व्यक्तीस्वातंत्र्य धोक्यात आणणारी काही उदाहरणे दिसतात. म्हणजे नागरिकांचे व्यक्तीस्वातंत्र्य ही व्यक्तीच्या जीवनाला पूर्णत्व आणत असतात. ती व्यक्तीला दारिद्र्य व अज्ञानापासून मुक्त करत असतात. अशी स्वातंत्र्ये जर लोकशाहीत दडपली गेली तर व्यक्ती विकास होणार नाही. थोडक्यात अश्या स्वातंत्र्याची गळचेपी, लोकशाही मुल्यांची हत्या हे लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे. शिवाय राजकीय गुन्हेगारीकारणामुळे व्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात येण्याचे प्रमाण वाढले आहे.

**२. सर्वसमावेशकतेचा अभाव –**

गेल्या सात दशकामध्ये भारतात लोकशाही व्यवस्था मजबूत करताना सर्वसमावेशकतेच्या तत्वाचा अभाव पहावयास मिळतो. भारतात बहुभाषिक, बहुधार्मिक लोक राहतात. त्यांच्यात एकात्मता निर्माण करून सर्वसमावेशक लोकशाही निर्माण करणे आवश्यक होते. परंतु गेल्या सात दशकात विविध भाषिक राज्यांमध्ये झालेले संघर्ष, विविध धर्मामध्ये झालेल्या दंगली यांच्यातून असे दिसते की, येथील लोकशाही समोर सर्व समावेशकता निर्माण करण्याचे आव्हान उभे राहिले आहे. तसेच सार्वजनिक धोरणामध्ये अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक यांच्या प्राधान्यक्रमात तफावत दिसते. शिवाय विकास योजनांमध्ये समाजातील सर्वच समाज घटकांना समान न्याय मिळतोच असे दिसत नाही. थोडक्यात गरीब-श्रीमंत, जात, धर्म, वंश, प्रादेशिकता व बहुभाषिकता अशा अनेक घटकांत भेदभाव होताना दिसतो. भारतीय लोकशाहीतील राजकीय प्रक्रियेत सुद्धा समाजातील विशिष्ट वर्गाला सत्तेचा वाटा मिळताना दिसतो. व्यावसायिक व नोकरशाहीच्या क्षेत्रातसुद्धा विशिष्ट वर्गच पुढारलेला दिसतो. अशा अनेक उदाहरणांवरून लक्षात येते की, सर्वसमावेशकता हे एक आव्हान भारतीय लोकशाही समोर उभा राहिला आहे.

**३. आर्थिक, सामाजिक व राजकीय विषमतेचे आव्हान –**

भारतात गेल्या ६०-७० वर्षाच्या काळात सामजिक, आर्थिक व राजकीय विषमतेत वाढ होताना दिसत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जरी जमिनदारी, सरंजामशाही अश्या संस्था नष्ट झाल्या असल्या तरी आर्थिक विषमता प्रचंड वाढली आहे. काही मोजक्या व संख्येने कमी लोकांच्या हातात अधिकाधिक संपत्ती व सत्ता आली आहे. तर दुसरीकडे बहुसंख्य जनता दारिद्र्य रेषेखाली आहे. सामाजिक बाबतीतही पुनरुज्जीवनवादी विचारांना आज प्रतिष्ठा येऊ पाहत आहे. जात व धर्माचे महत्व / वर्चस्व समाजजीवनात वाढत आहे. स्त्रिया व मागास समूहावर अत्याचार होण्याचे प्रमाण वाढले आहे. राजकीय बाबतीत विचार करता असे दिसते की, आज विविध राजकीय पक्ष राजकारणात जात व धर्माचा सरळसरळ वापर करत आहेत. राजकीय पक्ष विशिष्ट धर्माच्या लोकांनाच उमेदवारी देऊ करतात. सत्ता त्यांच्याच हातात जात आहे. या सर्वाची अनेक उदाहरणे भारतातील विविध राज्यात आपणास पाहवयास मिळत आहेत. थोडक्यात या सर्वांचे कारण आर्थिक व सामाजिक मागासलेपणात आहे. त्यामुळे आर्थिक, सामाजिक व राजकीय विषमता हे लोकशाही समोर हे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

**४. निवडणूक आयोग व विरोधी पक्षाची भूमिका -**

भारतीय लोकशाही शासनव्यवस्थेत २६ जानेवारी १९५० रोजी स्वतंत्र निवडणूक आयोगाची स्थापना केली आहे. भारतात स्वच्छ व खुल्या वातावरणात अनेक निवडणुका झाल्या आहेत. परंतु गेल्या काही वर्षात निवडणूक आयोगाच्या कार्यावर व भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निवडणूक आयोगाची भूमिका पारदर्शक असणे आवश्यक आहे परंतु ती संपूर्ण पारदर्शक आहे असे असे मानायला विरोधी पक्ष तयार नाहीत. त्यांच्या मते, निवडणूक आयोग हा सत्ताधारी पक्षाच्या हातातील बाहुले बनला आहे. तर वस्त परिस्थिती पाहता सत्ताधारी व विरोधी पक्षाकडून निवडणुकांमध्ये होणारे गैरव्यवहार, प्रमुख राजकीय नेतृत्वाकडून उमेदवाराच्या गुन्हेगारी प्रवृत्तीची केलेली पाठराखण आणि निवडणुका जिंकण्यासाठी वापरलेले गैरमार्ग अशा अनेक कारणांमुळे भारतीय लोकशाही समोर आव्हान निर्माण झाले आहे.

**५. राजकीय सहभागाचे प्रमाण –**

भारतात १९५१-५२ सालापासून झालेल्या लोकसभा व विविध राज्यातील विधानसभेच्या निवडणुकांचा आढावा घेता असे दिसते की, आजपर्यंत भारतात मतदानाची टक्केवारी ७०% पेक्षा वर गेलेले नाही. गेल्या ३० वर्षात ही आकडेवारी कमी होताना दिसत आहे. थोडक्यात राज्यकर्ता वर्ग, राजकीय व्यवस्था व विविध संविधानिक संस्था यांच्याकडे पाहण्याचा जनतेचा दृष्टिकोन बदलत आहे. जनता याबाबतीत उदासीन होताना दिसत आहे. परिणामी जनतेचा राजकीय सहभाग कमी होत आहे. एकूणच जनतेचा कमी राजकीय सहभाग हे लोकशाही समोर मोठे आव्हान उभा राहिले आहे.

**६. सत्तेचे केंद्रीकरण –**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात लोकशाही शासनव्यवस्था स्वीकारली निवडणुकांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी राज्यकारभार करू लागले. परंतु गेल्या ७५ वर्षाचा राजकीय इतिहास पाहता असे दिसते की, भारतीय राजकारणात नेतृत्वाची घराणेशाही निर्माण झाली आहे. शिवाय सत्ता विशिष्ट समाज घटकांच्याच हातात राहिली आहे. विशिष्ट निवडक लोकच राज्यकारभार करीत आहेत. म्हणजे सत्तेचे केंद्रीकरण झाले आहे. खऱ्या अर्थाने बहुजन समाजामध्ये सत्ता वितरित झालेली नाही. परिणामी सत्तेचे केंद्रीकरण हे भारतीय लोकशाही समोर सर्वात मोठे आव्हान उभे राहिले आहे.

**७. दहशतवाद व नक्षलवादाचे आव्हान -**

भारतात गेल्या ३०-४० वर्षात दहशतवाद व नक्षलवादाने लोकशाही समोर मोठे आव्हान उभा केले आहे. भारतातील विविध धार्मिक तीर्थक्षेत्रे, कायदेमंडळ, गर्दीची ठिकाणे व आर्थिक केंद्रे अशा अनेक ठिकाणी दहशतवादी हल्ले झाले आहेत. त्याची अनेक उदाहरणे देता येतील. या दहशतवादी कृत्यातून भारतीय अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेवर मोठा विपरीत परिणाम होत आहे. तसेच नक्षलवादी संघटनांकडूनही भारतातील राजकीय नेतृत्वाचे अपहरण, शाळकरी मुलांचे व नागरिकांचे अपहरण, हत्या आणि काही प्रशासकीय अधिकाऱ्यांचे अपहरण अशा अनेक घटना होताना दिसत आहेत. या सर्व बाबींचा नागरिकांच्या सार्वजनिक जीवनावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे भारतीय लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये सुद्धा नागरिकांच्या जीविताची शाश्वती राहिली नाही असे म्हणता येते. थोडक्यात दहशतवाद व नक्षलवादाचे मोठे आव्हान भारतीय लोकशाही समोर उभे राहिले आहे.

**८. वाढता भ्रष्टाचार -**

भारतीय लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये गेल्या पन्नास वर्षात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. आदर्श घोटाळा, हर्षद मेहता घोटाळा, संदेशवहन क्षेत्रातील घोटाळा, चारा

घोटाळा, सिंचन घोटाळा व मुद्रांक शुल्काबाबत घडलेला घोटाळा असे अनेक घोटाळे भारतात झाल्याची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. विशेषता: राजकीय नेतृत्व, मोठमोठे उद्योगपती आणि नोकरशाहीतील विविध प्रशासकीय अधिकारी यांचेकडून भारतात वरील प्रकारचे विविध घोटाळे झाले आहेत. त्यांच्यातील स्वार्थी प्रवृत्तीतून भ्रष्टाचार झालेला आहे. थोडक्यात भारतात भ्रष्टाचाराचे प्रमाण प्रचंड वाढत आहे. त्यामुळे भ्रष्टाचार हे येथील लोकशाही समोर नवे आव्हान उभारले आहे.

**९. पक्षांतर –**

गेल्या चार-पाच दशकात भारतीय राजकारणात राजकीय नेतृत्वाकडून वारंवार पक्षांतर होताना दिसत आहे. वैयक्तिक व आर्थिक लाभ मिळवणे, राजकीय सत्ता व पद मिळवणे या प्रमुख कारणांसाठी राजकीय नेतृत्वाने पक्षांतर केले आहे. परंतु राजकीय नेतृत्वाच्या या पक्षांतरामुळे भारतीय नागरिकांचा लोकशाहीवरील विश्वास कमी होत आहे. शिवाय राजकीय अस्थिरता निर्माण होऊन सार्वजनिक धोरणामध्ये मोठे फेरबदल होत आहेत. ज्याचा विकासावर विपरीत परिणाम होत आहे. तर पक्षांतरामुळे भारतात विवेकपूर्ण व जबाबदार लोकशाही अस्तित्वात आहे की नाही असा प्रश्नही निर्माण होतो आहे. थोडक्यात भारतातील राजकीय नेतृत्वाच्या पक्षांतरामुळे लोकशाही समोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

**१०. इतर आव्हाने –**

भारतीय लोकशाही समोर राजकीय क्षेत्रातील वाढते गुन्हेगारीकरण, वाढती प्रादेशिकता, राज्यांच्या स्वायत्ततेचा प्रश्न, भारतातील संविधानिक संस्थांचे कमी होत चाललेले महत्त्व, स्वहित व स्वार्थासाठी राजकीय पक्षांकडून विविध शासकीय संस्थाचा झालेला गैरवापर, महिलांचे राजकीय क्षेत्रातील सहभागाचे अल्पप्रमाण, सार्वजनिक धोरणात अल्पसंख्यांकांना दिले गेलेले दुय्यम स्थान आणि राजकारणात धर्म व जातीचा वाढलेला प्रभाव अशा अनेक गोष्टी भारतीय लोकशाहीसाठी आव्हाने बनवून उभा राहिल्या आहेत.

अशी अनेक आव्हाने भारतीय लोकशाही समोर उभी राहिली आहेत.

**इ. भारतीय लोकशाही समोरील आव्हानावरील उपाययोजना –**

भारतीय लोकशाहीचे जतन करण्यासाठी, तिला मजबूत बनविण्यासाठी पुढीलप्रमाणे विविध उपाय सांगता येतील.

१. भेदाभावाचा अंत –

भारतात जात, धर्म, वंश व प्रादेशिकता या कारणावरून आजही भेदाभेद पहावयास मिळतो. आपण जोपर्यंत हा भेदभाव संपुष्टात आणत नाही तो पर्यत लोकशाही सक्षम होऊन तिच्यात राजकीय सहभाग वाढणार नाही. म्हणून भेदभावाचा अंत करणे आवश्यक आहे.

२. लोकशाही मूल्यांच्या जपणुक –

भारतीय लोकशाहीचे जतन करण्यासाठी लोकशाहीच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे. तसेच संविधानातील विविध कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तर सार्वजनिक जनजागृती करून अभिव्यक्ती व भाषण स्वातंत्र्याचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे.

**३. संस्थात्मक सुधारणांची आवश्यकता –**

भारतात लोकशाहीस प्रगल्भ बनविण्यासाठी संस्थात्मक सुधारणांची आवश्यकता आहे. त्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्थेची व निवडणूक आयोगाची स्थापना करून चालणार नाही तर त्यांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य व निर्णय घेण्याची स्वायत्तता देणे आवश्यक आहे. शिवाय ती न्यायव्यवस्था व निवडणूक प्रक्रिया पारदर्शक ठेवणे. तसेच भ्रष्टाचार निर्मुलनासाठी विशिष्ट संस्था स्थापन करून तिला भ्रष्टाचार निर्मुलानाबाबत पूर्ण स्वातंत्र्य देणे किंवा कार्यक्षमपणे कार्य करू देणे आवश्यक आहे.

**४. इतर उपाययोजना -**

भारतीय लोकशाही समोरील आव्हाने दूर करण्यासाठी प्रामुख्याने शासकीय कारभारातील नागरिकांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. प्रामुख्याने त्यांचा राजकीय सहभाग कसा वाढेल याविषयी जनजागृती करणे व धोरणे ठरविणे आवश्यक आहे.

थोडक्यात भारतात लोकशाही शासनव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी लोकशाही मूल्यांची जोपासना, सत्तेचे विकेंद्रीकरण, नागरिकांचा राजकीय सहभाग, सामाजिक समता आणि शासनावरील लोकांचा विश्वास या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तसेच भारतात सामजिक परिवर्तन व प्रबोधनाची गरज आहे. शिवाय हे प्रबोधन लोकशिक्षणामार्फत होणे गरजेचे आहे. तर नागरिकांना लोकप्रतिनिधीवर व त्यांच्या कार्यावर अंकुश ठेवण्याचा हक्क किंवा स्वातंत्र्य, प्रतिनिधीना परत बोलावण्याचा हक्क देणे आवश्यक वाटते.

**ई. संदर्भ ग्रंथ सूची -**

1. डॉ. कांबळे बाळ, संपादक, भारतीय लोकशाही समोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१२.
2. सारथी अरुण, लोकशाही शोध आणि आव्हाने, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०२३.
3. Guha Ramachandra, India After Gandhi : The History of the World's Largest Democracy, Picador Publisher, 2017.
4. Mishra Savita and Datta Kirtidas, Indian Democracy : Issues and Challenges, Mittal Publication, 2022.